## इयत्ता – सहावी – पाठ्यक्रम

विद्यार्थ्यांना पुढील **उद्दिष्टे** साध्य करण्यास मदत व्हावी म्हणून चेतक आणि पोषक वातावरण निर्माण करणे–

१. सलग सूचना ऐकून त्यानुसार कृती करणे.

२. गाणी, कविता एकट्याने आणि समूहात तालासुरात म्हणणे.

३. ऐकून आवडलेल्या गोष्टी सांगणे.

४. विरामचिन्हांसह अचूक अनुलेखन आणि श्रुतलेखन करणे.

५. स्वतःचे अनुभव, कल्पना दोन–चार वाक्यांत लिहिणे.

६. कथा, कवितांचे आनंद घेत वाचन करणे.

७. एका मिनिटाला सुमारे ३५ शब्द या गतीने समजपूर्वक मूकवाचन करण्याचा सराव करणे.

८. प्रकट वाचनातील समान अक्षरांच्या अथवा शब्दांच्या पुनरावृत्तीमुळे येणारी मजा अनुभवणे.

९. वाक्यांतील नामांचे लिंग व वचन ओळखणे तसेच दिलेल्या शब्दांच्या विरूद्धार्थांचे शब्द सांगणे.

१०. सुमारे १००० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती, ४०० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती आणि १०० शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे.

११. साहित्यातील वर्णन केलेल्या समस्या समजणे.

१२. सामाजिक समस्यांबद्दल अन्य व्यक्तींशी चर्चा करणे.

# इयत्ता ६ वी –पाठ्यक्रम

## अध्ययनक्षेत्र १ – वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| शब्दसंपत्ती | बोलताना जाणीवपूर्वक विविध शब्दांचा वापर करणे.<br><br>मुलांच्या शब्दसंपत्तीत वाढ होण्यासाठी शब्दकोडी सोडवून घेणे. शब्दभेंड्या यांसारखे खेळ घेणे.<br><br>प्रत्येक विद्यार्थ्याला अक्षरे वाटून देणे. | नव्याने माहिती झालेले, ऐकलेले शब्द 'आमचा शब्दसंग्रह'मध्ये नोंदविणे. बोलताना व्यवहारामध्ये या शब्दांचा योग्य तेथे वापर करणे.<br><br>आपल्या वाट्याला आलेल्या अक्षरांचे शब्द वर्गातील मुलांकडून गोळा करणे व 'आमचा शब्दसंग्रह' यात नोंद करणे. | वर्गमित्रांशी होणाऱ्या संभाषणातून स्वतःच्या शब्दसंपत्तीत वाढ होते, हे लक्षात येते. | शाब्दिक खेळ खेळण्याचा आनंद घेतात. | दैनंदिन व्यवहारात बोलताना, लिहिताना योग्य शब्दांचा वापर करतात. | प्रकल्प |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| वाचनसाहित्य | पाठ्यपुस्तकातील पाठ वाचायला देऊन कोणते पाठ आवडले, ते का आवडले, याविषयी विचारणा करणे.<br><br>पाठ्येतर साहित्य मुलांना वाचनासाठी उपलब्ध करून देणे.<br><br>त्यासाठी वर्गातील वाचनकोपऱ्यामध्ये मुलांना आवडतील अशी व सहज घेता व हाताळता येतील अशी पाठ्येतर साहित्याची मांडणी करणे. | पाठांमधील कोणत्या कल्पना, कोणते विचार आवडले व ते का आवडले, हे सांगणे.<br><br>उपलब्ध झालेले वाचनसाहित्य आवडीने वाचणे. | वाचनसाहित्याचे वेगवगळे प्रकार असल्याची जाणीव होते. | अवांतर वाचनातून, गोष्टी वाचनातून आनंद मिळतो. | अवांतर वाचनाची सवय लागते. | निरीक्षण, उपक्रम |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| प्रकटवाचन | पाठांचे व अपरिचित साहित्याचे स्पष्ट शब्दोच्चारांसह, योग्य आरोह–अवरोहासह व योग्य गतीने वाचन करण्यास सांगणे. त्यासाठी अनुवाचनाचा सराव घेणे. टेपरेकॉर्डर, मोबाईल यांच्याद्वारे रेकॉर्डिंग करून/ऐकवून प्रत्येकाच्या प्रकट वाचनात होणाऱ्या गंमती दाखवून त्यातून सुधारणा करणे. व (काही विशिष्ट नमुने) | स्पष्ट शब्दोच्चारासह योग्य प्रकारे प्रकट वाचनाचा प्रयत्न करणे. | प्रकट वाचन उत्तम प्रकारे कसे करावे हे समजते. | प्रत्येकाच्या प्रकट वाचनात होणारी गंमत अनुभवतात.<br><br>वाचताना आत्मविश्वास वाढतो. | परिचित व अपरिचित मजकुरांचे प्रकटवाचन योग्य प्रकारे करतात. | तोंडी काम (प्रकटवाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| लेखन | पाठ्यपुस्तकातील व इतर साहित्यातील वाक्यांचे अनुलेखन करून घेणे. | अनुलेखन करताना अक्षरांचा योग्य आकार, अक्षरे-शब्दांतील योग्य अंतर लक्षात घेऊन अचूक लेखन करणे. | विरामचिन्हांचा वापर करून लेखन करतात. | अचूक लेखन करता आल्यामुळे आत्मविश्वास वाढतो. | अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करतात. | निरीक्षण उपक्रम (अनुलेखन व श्रुतलेखन) |
| | सोप्या, छोट्या वाक्यांचे श्रुतलेखन करण्याचा सराव घेणे. | श्रुतलेखन करताना शिक्षकांचे उच्चारण लक्षपूर्वक ऐकणे व बिनचूक वाक्ये लिहिण्याचा प्रयत्न करणे. | | | | |
| | लेखनासाठी विद्यार्थ्यांच्या अनुभवविश्वाशी निगडित विषय देणे. | स्वतःच्या भावना, कल्पना, विचार चार ते पाच वाक्यांत लिहिण्याचा प्रयत्न करणे. | | आपले विचार व्यक्त केल्याचा आनंद होतो. | स्वतःचे विचार लेखी व्यक्त करतात. | लेखी चाचणी |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| नादमयता (शब्दांमुळे) | प्राणी, वाहने, वाद्ये, कृती यांची नावे असलेली कार्डे व विविध नादमय शब्द लिहिलेली कार्डे गटांमध्ये वाटणे व जोड्या जुळविण्याच्या खेळासंबंधी सूचना देणे.<br>उदा. बेडूक – डराँव डराँव<br>ढोल – ढम्ढम्<br>पिणे – घटाघटा<br>इ. | गटामध्ये आपल्या वाट्याला आलेल्या कार्डाशी जोडी जुळणारे कार्ड शोधणे.<br>शोधलेल्या जोड्यांचे वाचन करणे.<br>सर्व जोड्यांचे पुन्हा एकत्र वाचन करणे. | प्रत्येक वस्तू, प्राणी, वाहने, वाद्ये व कृती आणि संबंधित आवाज यांच्यातील साहचर्य लक्षात राहते. | खेळाचा आनंद लुटतात. | परिसरातील विविध ध्वनी लक्षपूर्वक ऐकून प्राणी, वाहने, वाद्ये, कृती यांच्याशी संबंधित नव्या नादमय शब्दांची लेखी यादी तयार करतात. | स्वाध्याय लेखी चाचणी (शब्दलेखन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| कथाकथन | ऐकलेल्या, वाचलेल्या कथा सांगण्यासाठी प्रवृत्त करणे. कथा सांगितल्याबद्दल सांगणाऱ्यांचे कौतुक करणे. | वेगवेगळ्या विषयांवर कथा सांगणे. इतरांच्या कथा लक्षपूर्वक ऐकणे. | विविध विषयांवरील कथा माहिती होतात. | कथा सांगण्याचा आत्मविश्वास वाढतो व इतरांच्या कथा ऐकण्याचा आनंद होतो. | कथाकथन आत्मविश्वासपूर्वक करतात. | तोंडी काम (कथाकथन) |
| वचन | वर्गातील, शाळेतील अथवा दप्तरातील वस्तूंची नावे विचारून फलकावर लिहिणे. लिहिताना फलकाचे दोन भाग करून शब्द लिहिणे. उदा. वही – वह्या भिंत – भिंती शब्दांच्या रूपांमधील फरक मुलांना शोधायला लावणे. गटात काम करण्याविषयी सूचना देणे. | विविध नावांच्या एकवचनी आणि अनेकवचनी रूपांचे निरीक्षण करणे. त्यातील वेगळ्या रूपांसंबंधी चर्चा करणे. माहिती असलेल्या नावांचे वचन बदलणे. | एका गटातील शब्दांची त्याच प्रकारच्या दुसऱ्या गटातील शब्दांशी तुलना करतात. | नवीन माहिती मिळाल्याचा आनंद होतो. | दिलेल्या शब्दांचे वचन बदलून ते शब्द लिहितात. | लेखी चाचणी (शब्दलेखन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| समान अर्थाचे शब्द | कार्डांवर एकाच प्रकारची चित्रे व त्याखाली समान अर्थांचे शब्द असलेली नावे लिहून ती कार्डे वर्गात वाटणे. सारखी चित्रे असणाऱ्या मुलांना गट करायला लावणे.<br><br>परिचित समानार्थी शब्दांचा जाणीवपूर्वक वापर केलेल्या उताऱ्यांचे कार्ड गटात देणे. त्यातील समान अर्थाच्या शब्दांच्या याद्या करायला सांगणे. | सूचनेप्रमाणे गट तयार करून आपापल्या कार्डावरील चित्राखालील नाव वाचणे. उदा. सूर्याची चित्रे व त्याखाली रवी, भास्कर, सविता इ.<br><br>उतारा वाचून समानार्थी शब्दांच्या याद्या गटात तयार करणे. गटांमधून तयार झालेल्या शब्दांची नोंद 'आमचा शब्दसंग्रह' मध्ये करणे. | एकच वस्तू, व्यक्ती, प्राणी इ.साठी अनेक शब्द असतात हे समजते.<br><br>शब्दांचे वाचनातील संदर्भ आठवतात. | वर्गात खेळ खेळल्याचा आनंद होतो. | समानार्थी शब्दांचा बोलताना व लिहिताना योग्य संदर्भात वापर करतात. | तोंडी काम स्वाध्याय (शब्दलेखन) |